ISSN: 2348-3083
SJIF 2016 : 4.44
UGC APPROVED SR. NO. 48612
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR
HUMANITY SCIENCE & ENGLISH LANGUAGE

# शिक्षकांचे 'सामाजिक बुध्दिमत्ता' या विषयाशी संबंधित ज्ञान व त्याचे उपयोजन कौशल्य यांचा विश्लेषणात्मक अभ्यास

**हिरणवाळे स्नेहल रामनाथ**

*विद्यावाचस्पती (पीएच.डी.) विद्यार्थी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे*

**Abstract**

*२१ वे शतक हे जागतिकीकरणाचे, उदारीकरणाचे शतक आहे. अशावेळी आंतरराष्ट्रीय सामंजस्य व विश्वबंधूत्वाची भावना असणे गरजेचे आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे नागरिक आहेत, त्यामुळे त्यांच्यात ह्या भावना, सामाजिक मूल्ये रूजवणे गरजेचे आहे. बालकांचा सामाजिक विकास हा 'उत्तर बाल्यावस्था' या वयोगटात मोठ्याप्रमाणावर होते. 'सामाजिक बुध्दिमत्तेचे' महत्त्व ओळखून अभ्यासक्रमात त्याचा समावेश झाला आहे. शिक्षक हे अभ्यासक्रम व विद्यार्थी यातील महत्त्वपूर्ण दुवा असल्याने त्यांचे 'सामाजिक बुध्दिमत्ता' या घटकाविषयी असलेले ज्ञान व त्याचे उपयोजन या घटकांचा अभ्यास करण्यासाठी शिक्षक प्रश्नावली भरून घेण्यात आली. त्याच्या विश्लेषणावरून असे लक्षात येते की, 'सामाजिक बुध्दिमत्ता' याविषयी शिक्षकांना पुरेसे ज्ञान नाही. तसेच बालकांच्या 'सामाजिक बुध्दिमत्ता' विकासासाठी ते पारंपारिक पध्दतीचा व उपक्रमांचा वापर करत आहेत.*

***महत्त्वाच्या संज्ञा :*** *सामाजिक विकास, सामाजिक बुध्दिमत्ता, उत्तर बाल्यावस्था*

Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com

- **प्रस्तावना :**

जीवनात यशस्वी होण्यासाठी केवळ शैक्षणिक बुध्दिमत्ता, आर्थिक सुबत्ता असणे गरजेचे नाही. निकोप नातेसंबंध, समाधान यशस्वी सामाजिक संबंध, यशस्वी कारकीर्द यासाठी व्यक्तीची 'सामाजिक बुध्दिमत्ता' विकसित होणे अत्यंत गरजेचे आहे.

वर्मन यांच्या मते,

''सामाजिक बुध्दिमत्ता म्हणजे सामान्यपणे इतरांशी केले जाणारे वर्तन, सामाजिक तंत्र किंवा सामाजिक सुलभता, सामाजिक विषयांचे ज्ञान, गटातील इतर व्यक्तींविषयी संवेदनशीलता, समानुभूती, इतरांच्या मनस्थिती जाणून घेण्याची क्षमता तसेच अनोळखी व्यक्तींची मूलभूत व्यक्तिमत्व वैशिष्ट्ये जाणून घेण्याची क्षमता.''

व्यक्तीचा 'सामाजिक विकास' हा त्याच्या उत्तरबाल्यावस्था (९ ते १२ वर्षे) या विकासावस्थेत मोठ्याप्रमाणावर होतो. या कालखंडास 'शालेय कालखंड' असेही म्हणतात. शालेय वातावरण व शिक्षक यांचा बालकाच्या विकासावर मोठा परिणाम होतो. 'सामाजिक बुध्दिमत्ते'चे महत्त्व ओळखून अभ्यासक्रमात त्याचा समावेश करण्यात आला आहे.

शिक्षक हा अभ्यासक्रम व विद्यार्थी यातील महत्त्वपूर्ण दुवा आहे. अभ्यासक्रमाची उद्दिष्टे पूर्ण करणे, अभ्यासक्रमातील गाभा घटक, जीवनकौशल्ये, मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रूजवणे यात शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

त्यामुळेच बालकाच्या 'सामाजिक बुध्दिमत्ता विकसनातील' शिक्षकाची महत्त्वपूर्ण भूमिका लक्षात घेऊन शिक्षकाचे 'सामाजिक बुध्दिमत्ता' विषयाचे ज्ञान व त्याचे उपयोजन कौशल्य यांचा विश्लेषणात्मक अभ्यास हा प्रस्तूत संशोधनाचा हेतू आहे.

- **संशोधन पध्दती :**
  - **जनसंख्या :** पुणे शहरातील सर्व शिक्षक, विषयतज्ञ, संस्थाचालक, तज्ञ मार्गदर्शक, मुख्याध्यापक इ. शिक्षणक्षेत्राशी संबंधित व्यक्ती
  - **न्यादर्श :** मराठी व इंग्रजी माध्यमातील शिक्षक, विषयतज्ञ, मुख्याध्यापक इ. एकूण ५० व्यक्ती.
  - **न्यादर्शन पध्दती :** प्रासंगिक नमूना निवड
  - **माहिती संकलन साधन :** शिक्षक प्रश्नावली
  - **संशोधन पध्दती :** सर्वेक्षण पध्दती
  - **संशोधन कार्यपध्दती :** शिक्षकाचे 'सामाजिक बुध्दिमत्ता' या घटकाविषयीचे ज्ञान व या ज्ञानाचे ते करीत असलेले उपयोजन तपासण्यासाठी संशोधिकेने एक प्रश्नावली तयार केली. यात ५ प्रश्न वस्तूनिष्ठ तर ५ प्रश्न वर्णनात्मक / निबंधवजा प्रकारचे होते. पुणे शहरातील मनपा संचलित तसेच खाजगी व्यवस्थापनाच्या इंग्रजी व मराठी माध्यमातील उत्तर बाल्यावस्था (९ ते १२ वर्षे वयोगट) असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकवणारे शिक्षक, विषयतज्ञ, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, संस्थाचालक, तज्ञ अशा एकूण ५० जणांकडून प्रश्नावली भरून घेतली.
  - **प्रश्नावलीचे विश्लेषण :** शिक्षणक्षेत्रातील ५० जणांनी प्रश्नावलीमार्फत 'सामाजिक बुध्दिमत्ता' या विषयावरील आपले विचार पुढीलप्रमाणे व्यक्त केले.

**वस्तूनिष्ठ प्रश्नांचे विश्लेषण**

| प्रश्न क्र. | प्रश्न | प्रतिसाद होय संख्या | % | नाही संख्या | % | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | बुध्दिमत्ता ही संकल्पना बहुआयामी आहे. बुध्दिमत्तेचे वेगवेगळे प्रकार आहेत. हे आपणास माहिती आहे का? | ४८ | ९८% | २ | ४% | ५० | १००% |
| ३ | 'सामाजिक बुध्दिमत्ता' हा बुध्दिमत्तेचा एक प्रमुख आयाम/पैलू आहे हे आपणास माहिती आहे का? | ४८ | ९६% | २ | ४% | ५० | १००% |
| ४ | पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या अभ्यासक्रमात 'सामाजिक बुध्दिमत्ता' हा घटक समाविष्ट झाला आहे हे आपणास माहिती आहे का? | ३६ | ७२% | १४ | २८% | ५० | १००% |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ‘सामाजिक बुध्दिमत्ता’ ही योग्य व अनुकूल परिस्थिती निर्माण करून विकसित करता येते, असे आपणास वाटते का? | ४५ | ९०% | ०५ | १०% | ५० | १०० |
| ७ | तुम्ही राबवत असलेले शालेय उपक्रम विद्यार्थ्यांच्या ‘सामाजिक बुध्दिमत्ता’ विकसनासाठी पुरेसे आहेत असे आपणास वाटते का? | १७ | ३४% | ३३ | ६६% | ५० | १००% |

**वर्णनात्मक प्रश्नांचे विश्लेषण**

**प्र. १ला. ‘बुध्दिमत्ता’ म्हणजे काय?**

या प्रश्नाच्या प्रतिसादात ‘बुध्दिमत्ता’ म्हणजे ‘आकलनशक्ती’, ‘विचारशक्ती’, ‘ज्ञान’, ‘परिस्थिनीनुसार वर्तन’, ‘निर्णयक्षमता’, ‘उपयोजनक्षमता’ इ. मते नोंदवली आहेत.

**प्र. ५वा. ‘सामाजिक बुध्दिमत्ता’ हा घटक कोणत्या अध्यापन पध्दतीने शिकवता?**

प्रसंग व प्रत्यक्ष अनुभवाद्वारे तसेच चर्चा व संवाद याद्वारे ‘सामाजिक बुध्दिमत्ता’ शिकवण्यावर शिक्षकांना भर दिसून येतो.

**प्र. ७ वा. विद्यार्थ्यांच्या ‘सामाजिक बुध्दिमत्ता’ विकसनासाठी तुम्ही कोणते शालेय उपक्रम राबवता?**

क्षेत्रभेटी, सांस्कृतिक कार्यक्रम, सहशालेय उपक्रम, प्रसंगाद्वारे जाणीव या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या ‘सामाजिक बुध्दिमत्ता’ विकसनासाठी शिक्षक प्रयत्न करताना दिसून येतात.

**प्र. ८वा. ‘सामाजिक बुध्दिमत्ता’ विकसनासाठी आणखी कोणते उपक्रम सुचवता येतील?**

समाजसेवा शिबिरे, सामाजिक संस्थाां भेटी, जाणीव जागृती कार्यक्रम, सहली, प्रसारमाध्यमांद्वारे जागृती इ. उपक्रम शिक्षकांनी सुचवले.

**प्र. १०वा. ‘सामाजिक बुध्दिमत्ता’ विकसित होणे आपणास का महत्त्वाचे वाटते?**

एक सुदृढ, सक्षम समाज निर्माण व्हावा, राष्ट्राची प्रगती व्हावी यासाठी विद्यार्थ्यांची ‘सामाजिक बुध्दिमत्ता’ विकसित व्हावी असे बहुतांश प्रतिसादकांना वाटते.

पण बालकांचे वैयक्तिक जीवन सुखी व यशस्वी होण्यासाठी तसेच त्याच्या नातेसंबंधाचे सुयोग्य व्यवस्थापन होण्यासाठीसुध्दा ‘सामाजिक बुध्दिमत्ता’ तितकीच महत्त्वपूर्ण आहे. हे महत्त्व प्रतिसादकांना जाणवलेले दिसत नाही. केवळ एकाच प्रतिसादकाला त्याचे महत्त्व पटलेले दिसून येते.

- **चर्चा :**

वरील प्रश्नांच्या विश्लेषणातून असे दिसून येते की,

१) शिक्षक प्रतिसादकांना ‘बुध्दिमत्ता’ ही संकल्पनाच मुळात पुरेशी स्पष्ट नाही असे त्यांच्या प्रतिसादावरून दिसून येते.

२) ‘बुध्दिमत्ता’ ही संकल्पना बहुआयामी आहे व बुध्दिमत्तेचे वेगवेगळे प्रकार आहेत हे बहुतांश प्रतिसादकांना ज्ञात आहे.

३) 'सामाजिक बुध्दिमत्ता' हा बुध्दिमत्तेचा एक प्रमुख प्रकार आहे हे सुध्दा बहुतांश प्रतिसादकांना माहिती आहे.

४) पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षेच्या अभ्यासक्रमात 'सामाजिक बुध्दिमत्ता' हा घटक समाविष्ट झाला आहे हे ७२% च प्रतिसादकांना माहिती आहे.

५) 'सामाजिक बुध्दिमत्ता' हा घटक शिकवण्यासाठी प्रसंग, प्रत्यक्ष अनुभव, चर्चा व संवाद यावरच प्रतिसादकांचा भर असल्याचे दिसून आले.

६) 'सामाजिक बुध्दिमत्ता' ही योग्य व अनुकूल परिस्थिती निर्माण करून विकसित करता येते असे बहुतांश म्हणजे ९०% प्रतिसादकांना वाटते.

७) 'सामाजिक बुध्दिमत्ता' विकसनासाठी प्रतिसादकांकडून पारंपरिक उपक्रम राबवले जात असल्याचे निदर्शनास येते. नावीन्यपूर्ण, वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम फारसे राबवले जात नसल्याचे दिसून येते.

८) प्रतिसादक राबवत असलेले उपक्रम 'सामाजिक बुध्दिमत्ता' विकासासाठी पुरेसे नसल्याचेही मत बहुतांश प्रतिसादकांनी नोंदवले आहे.

९) समाजाचा एक सजग व सुजाण नागरिक होण्यासाठी विद्यार्थ्यांची 'सामाजिक बुध्दिमत्ता' विकसित व्हावी असे बहुतांश प्रतिसादकांना वाटते. पण विद्यार्थ्यांचे वैयक्तिक जीवन सुखी समाधानी होण्यासाठी, निकोप व सुदृढ नातेसंबंधासाठी ही 'सामाजिक बुध्दिमत्ता' गरजेचे आहे असे प्रतिसादकांना वाटत नाही.

- **संदर्भ :**

*कुकडे–लवळेकर, अनघा (२००८). सामाजिक जाणीव संवर्धन–प्रयोगातून–प्रशिक्षणाकडे, कार्यवाह, ज्ञानप्रबोधिनी, पुणे–३०.*
*बापट, गिरीश. श्रीकृष्ण. (२०१४), मनुष्यघडणीसाठी आवाहन, खंड – १, ज्ञानप्रबोधिनी संशोधन संस्था, सदाशिव पेठ, पुणे – ३०.*
*खिरे, उषा (२०१०) हसत खेळत बुद्धिविकास, ज्ञानप्रबोधिनी संशोधन संस्था, सदाशिव पेठ, पुणे–३०.*
*तापकीर, दत्तात्रेय. तापकीर, निर्मला. लोंढे, गौतम. (२०११), अध्ययनकर्त्याचे आकलन व विकसन, संघमित्रा प्रकाशन, मिरज.*
*Goleman, Daniel. (2006) Social Intelligence, Hutchninson, London.*
*Guilford, J. P. (1977) Way beyond the IQ, The creative Education foundation. Inc. Buffalo, New York.*
*Hurlock, Elizabeth, B. (1978) Child Development, MCGraw – Hill book Co., Singapore.*
*Erikson, Erik. H. (1950) Childhood & Society, W. W. Norton and company, New York.*

- **वेबसाईट :**

*brain connection.brainhq.com/2005//11 the –school-role-in developing -intelligence/*

- **संशोधने :**

*Agarwal, Rajiv. (2013) social Intelligence and Teacher Effectiveness, Ph.D. Thesis. Bundel Khand University. Jhansi.*

*Gupta. Goggi (2013) Teacher effectiveness in Relation to stress teaching aptitude emotional and social intelligence.*